दैनिक
# आकर्षण
वर्धापन दिन
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक ८ । मंगळवार २२ सप्टेंबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## धीरज परदेशी हत्या प्रकरणातील पाच आरोपींचा जामीन फेटाळला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर शहरातील बहुचर्चित धीरज परदेशी हत्या प्रकरणातील पाच प्रमुख आरोपींचे नियमित जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट क्र. १ चे न्यायाधीश आर. एस. गुप्ता यांनी फेटाळून लावले आहेत. हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा व पूर्वनियोजित कटाचा भाग असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरोपींना कोणताही दिलासा देण्यास नकार दिला.

युनुस खानसाहेब शेख, वसीम रहिम सैयद, इम्रान मुसा सैयद, अरमान लियाकत सैयद आणि मोहम्मद रशाद इम्रान सैयद अशी जामीन फेटाळण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

दिनांक ७ ऑगस्ट रोजी दुपारी सव्वाचार वाजेच्या सुमारास मुकुंदनगर येथील दर्गा दायरा कब्रस्तानजवळ फिर्यादी



अक्षय मुळे, मयत धीरज परदेशी व साक्षीदार काव्य तावरे हे स्ट्रीट लाइट पॅनलचे काम करत होते. त्यावेळी मेहराज सैयद, सिराज सैयद, मुस्तकीन सैयद, युनुस शेख व अन्य इसमांनी बेकायदेशीर टोळी जमवून धीरज परदेशी यांच्यावर लाकडी बल्ल्या आणि लोखंडी पाईपने जीवघेणा हल्ला चढवला. गंभीर जखमी झालेल्या धीरज यांचा मॅककेअर हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान ९ ऑगस्ट रोजी मृत्यू झाला.

पोलिस तपासात निष्पन्न झालेल्या इतर आरोपींनी जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे जोरदार युक्तिवाद करण्यात आला. आरोपींनी संगनमत करून हा पूर्वनियोजित कट रचला असून, गुन्ह्याचा तपास अजून प्राथमिक टप्प्यात आहे व आरोपींची ओळख परेड होणे बाकी आहे, हा मुद्दा न्यायालयाने ग्राह्य धरला.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकील ॲड. पुष्पा कापसे–गायके यांनी प्रभावी बाजू मांडली. त्यांना मूळ फिर्यादीचे वकील ॲड. सुहास टोणे, ॲड. सागर टाक व ॲड. अमित गाडेकर यांनी सहकार्य केले.

## कोतवालीचे पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे यांच्या मनमानी कारभाराची चौकशी करावी

**नीलेश बांगरे यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन, हल्लेखोर आरोपीला मेढे पाठीशी घालत असल्याचा दावा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोतवाली पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे यांच्या पक्षपाती आणि मनमानी कार्यपद्धतीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे सरचिटणीस नीलेश बांगरे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे. मेढे यांच्यावर गंभीर आरोप करत त्यांची त्रयस्थ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून तातडीने निलंबन अथवा बदली करण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २१ सप्टेंबर रोजी मार्केट यार्ड चौकातील नगर तालुका उपनिबंधक कार्यालयात अल्ताफ गुलाब सय्यद याने धुडगूस घालून कर्तव्यावर असलेले कर्मचारी देविदास पारधे यांच्यावर स्क्रू ड्रायव्हरने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. इतर कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे पारधे बचावले. ही तक्रार कोतवाली पोलीस ठाण्यात गेल्यानंतर उपनिरीक्षक दीपक मेढे यांनी आरोपीची बाजू घेत फिर्यादी पारधे यांनाच सुमारे ६ तास चौकशीच्या नावाखाली वेठीस धरल्याचा आरोप बांगरे यांनी केला आहे. शासकीय कामात अडथळा आणि प्राणघातक हल्ल्याचा गंभीर गुन्हा असतानाही आरोपी अल्ताफ सय्यद याला केवळ नोटीस देऊन सोडून देण्यात आले, तर उलट फिर्यादीवरच अदखलपात्र गुन्हा दाखल करून मोबाईल चोरीचा गुन्हा नोंदवण्याची धमकी दिली गेली, असे निवेदनात नमूद केले आहे.

### गणेशोत्सव ढोल पथकातील तरुणांवर केली होती तात्काळ अटकेची कारवाई

यापूर्वी गणेशोत्सवादरम्यान ढोल पथकातील तरुणांवर अशाच कलमांखाली तत्काळ अटकेची कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे मेढे यांच्या कार्यशैलीवर आणि निष्पक्षतेवर गंभीर संशय निर्माण झाल्याचे बांगरे यांनी म्हटले आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, मेढे यांचे कॉल डिटेल्स तपासावेत आणि अहवाल येईपर्यंत त्यांना तत्काळ निलंबित अथवा अन्यत्र बदली करावी, अशी ठाम मागणी नीलेश बांगरे यांनी केली आहे.



नगरमधील सर्वच देखावेखुले झाले. यामुळे नगरशहरात देखावे पाहण्यासाठी गर्दी होत आहे पावसानेही यावेळी हजेरी लावल्याने नागरिकांची हाल झाले. परंतू नागरिकांनी भरपावसात देखाव्याचा आनंद घेतला. (छाया– उदय जोशी)

## भिंगार कॅम्प हद्दीतील हातभट्टी अड्ड्यावर छापा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या विशेष पथकाने भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गावठी हातभट्टीच्या दारू अड्ड्यावर अचानक छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ५ हजार रुपये किमतीची ५० लिटर तयार गावठी दारू जप्त करून ती जागेवरच नष्ट केली आहे.

याप्रकरणी सुनील अशोक लोणारे (वय ३६, रा. लोणारे वस्ती, कापूरवाडी ता. नगर) याच्यावर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कापूरवाडी–आगडगाव रोडवरील लोणारे वस्ती येथे साई किराणा जनरल स्टोअर्सच्या बाजूला एका सार्वजनिक ठिकाणी, भिंतीच्या आडोशाला बेकायदेशीररित्या गावठी दारूची विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता, आरोपी सुनील लोणारे हा गावठी हातभट्टीची दारू स्वतःच्या ताब्यात बाळगून तिची छुप्या पद्धतीने विक्री करत असल्याचे रंगेहाथ आढळून आले. पोलिसांनी त्वरित कारवाई करत ५० लिटर दारू जप्त केली व ती जागेवरच नष्ट केली.

सदर कारवाईत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल महेश मगर, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल मंगल हिरवे, पोलीस नाईक हेमंत खंडागळे, पोलीस कॉन्स्टेबल सागर द्वारके आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल राधिका वाघ यांनी सहभाग घेतला.

## भगवान विष्णूच्या दशावतारांचा जिवंत देखावा गणेश भक्तांचे आकर्षण

**जय हिंद तरुण मंडळाचा उपक्रम; आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते देखाव्याचे उद्घाटन**
**देखाव्याच्या माध्यमातून धार्मिक संस्कृतीचे जतन आमदार संग्राम जगताप**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवानिमित्त जुना बाजार येथील जय हिंद तरुण मंडळाच्या वतीने भगवान विष्णूच्या दशावतारांचा आकर्षक जिवंत देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा हा जिवंत देखावा गणेश भक्तांचे आकर्षण ठरत असून, देखावा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सव सुरू करून त्यातून समाजप्रबोधनाचे कार्य सुरू केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक, ऐतिहासिक तसेच समाजप्रबोधनाचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा, यासाठी देखाव्यांची परंपरा सुरू झाली. या परंपरेतून आजही विविध मंडळे सामाजिक व सांस्कृतिक विषयांवर जनजागृती करण्याचे काम करीत आहेत.

जुना बाजार येथे माजी नगरसेवक विपुल शेटीया यांच्या माध्यमातून जय हिंद तरुण मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपत सकारात्मक दृष्टिकोनातून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. गणेशोत्सवाच्या ■ पान ४ वर




## दै. आकर्षण निवडक

### अहमदनगर कॉलेजमध्ये २२ सप्टेंबरला ‘TECHNO MUTATION 2026’ संगणक प्रदर्शन

अहिल्यानगर - बी.पी.एच.ई. सोसायटीच्या अहमदनगर कॉलेजमधील संगणक शास्त्र विभागातर्फे २२ सप्टेंबर २०२६ रोजी मढएउक्कज चणढअढखजछ २०२६फ या भव्य संगणक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कॉलेजच्या संगणक शास्त्र विभागाच्या प्रांगणात सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत हे प्रदर्शन होणार आहे. अहमदनगर कॉलेजमध्ये संगणक प्रदर्शनाची सुरुवात १९९४ पासून झाली असून, विद्यार्थ्यांमध्ये संगणक व तंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच त्यांच्या तांत्रिक आणि सर्जनशील कौशल्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमाची परंपरा आजही विविध स्वरूपात पुढे सुरू आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अहिल्यानगर शहरातील विविध महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांमध्ये संगणकाविषयी असलेली जागरूकता जाणून घेण्यासाठी प्रश्नावली सोडवून घेण्यात आली. या माध्यमातून विद्यार्थ्यांचे संगणकविषयक ज्ञान, तंत्रज्ञानातील आवड तसेच बदलत्या संगणकीय क्षेत्राविषयीची माहिती जाणून घेण्यात आली. या प्रदर्शनात अहिल्यानगर शहर तसेच विविध महाविद्यालयांमधील आणि विविध शाखांमधील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहेत. विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान क्षमता, इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट्स, रोबोटिक्स तसेच अद्ययावत संगणकीय प्रणालींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व सादरीकरण हे प्रदर्शनाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. तसेच तज्ज्ञ परीक्षकांद्वारे उत्कृष्ट प्रोजेक्ट्सची निवड करण्यात येईल. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजित कुलकर्णी, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. सय्यद रजाक आणि प्राध्यापकवृंद यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. अहिल्यानगर शहरातील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच तंत्रज्ञानप्रेमींनी या प्रदर्शनास आवर्जून भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाला प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

### गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निमगाव वाघात वृक्षारोपण

अहिल्यानगर- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात हा उपक्रम राबविण्यात आला. धार्मिक उत्सवाला सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांची जोड देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या वृक्षारोपण उपक्रमात ग्रामस्थांनी सहभाग नोंदविला. मंदिर परिसरात विविध प्रकारची झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, विधीज्ञ ॲड. राजेश कावरे, साहेबराव बोडखे, लक्ष्मण चौरे, भाऊसाहेब आनंदकर, भागचंद जाधव, बापू पुंड, सिताराम फलके, भाऊसाहेब जाधव, बबन जाधव, प्रमोद जाधव, भरत बोडखे, संदीप डोंगरे, सदाशिव कापसे, सुशांत जाधव, नवनाथ हारदे, विजय जाधव, जयराम जाधव आदी उपस्थित होते. पै. नाना डोंगरे म्हणाले की, ‘‘गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्याला सामाजिक आणि पर्यावरण संवर्धनाची जोड मिळणे गरजेचे आहे. वृक्ष हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. वाढते तापमान, बदलते हवामान आणि कमी होत चाललेली हिरवाई पाहता प्रत्येकाने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात वृक्षारोपण करून धार्मिक स्थळाच्या परिसरातही हिरवाई वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आज लावलेले प्रत्येक झाड भविष्यात अनेकांना सावली, शुद्ध हवा आणि पर्यावरणाचा आधार देणार असल्याचे त्यांनी सांगितले.ॲड. राजेश कावरे म्हणाले की, ‘‘पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आपण विकासाच्या दिशेने पुढे जात असताना निसर्गाचा समतोलही जपला पाहिजे. वृक्षांची संख्या वाढविण्याबरोबरच लावलेल्या झाडांचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे आहे. गणेशोत्सव हा मोठ्या उत्साहाचा आणि जनसहभागाचा उत्सव आहे.

# भगवान श्री चक्रधर स्वामींचा ८०६ वा अवतार दिन सोहळा उत्साहात

**महानुभाव आणि वारकरी संप्रदायाचे विचार एकच सामाजिक सौहार्द जपणे काळाची गरज – प. पू.प.म. बाभुळगावकर शास्त्री**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भगवान श्री चक्रधर स्वामी यांनी महाराष्ट्राला एका सूत्रात बांधून या भूमीला महान राष्ट्र बनवले. महाराष्ट्राला मोठी साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. वारकरी संप्रदाय असो वा महानुभाव संप्रदाय दोघांनीही आपल्या विचारांतून समाजाला एकत्र आणण्याचे आणि समतेचा संदेश देण्याचे कार्य केले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि भगवान चक्रधर स्वामी यांच्या विचारांमध्ये मोठे साम्य दिसून येते. काही लोक विनाकारण भाषेबद्दल गैरसमज पसरवतात, परंतु ज्ञानेश्वर माउलींपासून ते महानुभाव संप्रदायातील आद्य कवी–कवयित्रींपर्यंत सर्वांनीच मराठी भाषेला वैभवाच्या शिखरावर नेले आहे .कोणाचाही द्वेष न करता अविरोध भावनेने समाजसेवा करा. माणसाचे मन हेच खरे मंदिर असून समाजात मैत्री आणि बंधुभाव जपणे अत्यंत आवश्यक आहे .संतांनी समाजाची जागृती केली आहे अहिल्यानगर जिल्ह्याला संतांचा वारसा लाभलेला आहे .श्री चक्रधर स्वामींचे चरित्र हे नगर जिल्ह्यात लिहिले गेले हे आपल्या जिल्ह्याचं भाग्य आहे .चक्रधर स्वामींचे विचार हे मुळापर्यंत जाणारे होते .स्वामींनी कधीही भेदभाव केला नाही सर्वच समाजाचा आदर करायला त्यांनी शिकवले संतांच्या शिकवणीचा सर्वांनी आस्वाद घ्यावा असा मोलाचा संदेश प.पू. प.म. बाभुळगावकर शास्त्री यांनी दिला.

अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषद व नगर तालुका महानुभाव समितीच्या वतीने भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी यांचा ८०६ वा अवतार दिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते . यावेळी आ. संग्राम जगताप, कवीश्वर कुलाचार्य प पू. प .म आचार्य कारंजेकर बाबा परिषदेचे कार्याध्यक्ष प .पु . प .म आचार्य वर्धनस्थ बिडकर बाबा, बाबुळगावकर बाबा, कृष्णराजबाबा लाड, व्हीआरडीच्या आचार्य प . पू. त . पूनमबाईजी महानुभव ,अहिल्या नगरचे नूतन, अध्यक्ष मल्ले बाबा .अरणगाव चे निमगावकर बाबा फाटे बाबा, वायंदेकर बाबा ,वाल्हेरज बाबा बिडकर ,तालुका अध्यक्ष भगवान अनारसे उपाध्यक्ष विजय साठे, ॲ . बाबासाहेब रणसिंग राजू सरोदे, इं. जगताप ,सुरेखा ठोकळ, सुरंगा विधाते ,भारती जाधव.आदींसह विविध संस्थांचे प्रतिनिधी, जिल्ह्यातील पदाधिकारी, वारकरी व महानुभाव संप्रदायातील साधू–संत आणि हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

# गणेशोत्सवाने दिला ‘आपली पृथ्वी वाचवूया’चा संदेश

**एमआयडीसीतील पॉलीमिक्ट ग्रूपचा पर्यावरणपूरक उपक्रम चर्चेत**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ‘आपली पृथ्वी वाचवूया’ या संकल्पनेसह शाश्वत उत्पादनाचा महत्त्वपूर्ण संदेश देत अहिल्यानगर एमआयडीसीमधील पॉलीमिक्ट ग्रूप पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करत आहे. हा उपक्रम शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

कंपनी कॅम्पसमध्ये गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेला आकर्षक देखावा, केवळ सजावट नसून उद्योग क्षेत्राने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा आणि शाश्वत उत्पादनाचाचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा संदेश देणारा आहे. उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणाचा विचार, संसाधनांचा योग्य वापर, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकास यांचे महत्त्व या देखाव्यातून अधोरेखित करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे हा विचार केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित न ठेवता पॉलीमिक्ट ग्रूपकडून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे या देखाव्यातून दिलेला संदेश हा केवळ विचार नसून कंपनीच्या कार्यपद्धतीशी जोडलेला आहे.

प्रत्येक कंपनीने शाश्वत उत्पादनाचा विचार करून आपल्या उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब केला तर भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वीचे संरक्षण करणे शक्य होईल. पुढील ५० वर्षांसाठी पृथ्वी टिकवायची असेल, तर आजपासूनच उद्योगांनी शाश्वत उत्पादनाचा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे, हा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. हा सुंदर आणि विचारप्रवर्तक देखावा साकारण्यासाठी पॉलीमिक्टच्या टीमने आपले कौशल्य, सर्जनशीलता आणि टीमवर्क पणाला लावले. या उपक्रमात मनीष अकोलकर, हर्ष राजगुरू, अथर्व पिंगे, धनश्री बारस्कर, आर्या हराळे, सम्राट मुरकुटे, संभाजी नवले, चांगदेव साठे, वीणा तट्टू, ऋषिकेश जाधव, तेजल खोडदे, संतोष भिताळे, रोशन भूवड, अण्णा अडागळे, अजय निमोणकर, किशोर कसबे, गणेश शिंदे, रवींद्र नन्नावरे, कल्याणी पंडुरे, अलवत कुमार, प्रवीण माने, भरत डोंगरे, आरती अनारसे, सुरभी देशमुख–खिस्ती, त्रिवेणी करांडे, रोहित मुळे, रावसाहेब पाटील यांनी योगदान दिले.

या उपक्रमासाठी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रामचंद्र सुखटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चिन्मय सुखटणकर तसेच सिनियर मॅनेजमेंट टीममधील रवींद्र महाजन, शंतनू खानवेलकर, संजय राणे, वसंत पाटील, विशाल भट, प्रवीण कुलकर्णी, सारंग शुक्रे, प्रदीप गायकवाड, संजय पर्वत, जोशी, राजू केनी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

# आयकॉन पॅराडाईजमध्ये विद्यार्थ्यांचे संवेदीकरण

**एचआयव्ही, टीबीसह विविध आजारांबाबत जनजागृती; विद्यार्थी–शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** विशाल बहुउद्देशीय प्रतिष्ठान संचलित आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूलमध्ये जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग (दिशा), जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ‘इंटेन्सिफाईड आयईसी कॅम्पेन’अंतर्गत विद्यार्थी व शिक्षकांसाठी संवेदीकरण कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. बी. रामावत होते. ग्रामीण रुग्णालय पैठणचे समुपदेशक बी. बी. गायकवाड, स्कूल कॉर्डिनेटर शैजू डॅनियल यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य रामावत यांनी कार्यशाळेचा उद्देश व महत्त्व स्पष्ट केले.

समुपदेशक बी. बी. गायकवाड यांनी एचआयव्ही संसर्गाची कारणे, लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सकस आहार, वेळेवर जेवण आणि हिरव्या पालेभाज्यांचा आहारात समावेश करण्याचे आवाहन केले. टीबी व इतर आजारांची लक्षणे तसेच घ्यावयाची दक्षता याबाबतही त्यांनी सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेत विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे. ई. येवले व एस. सी. औरंगे यांनी केले, तर आभार संदीप तांबे यांनी मानले. यावेळी प्रा. सारिका वरकड, प्रा. प्रियांका औटी, प्रा. बी. आर. पठाण, यश परदेशी, निलेश देशमुख, ऋषिकेश नवथर, अंबरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

# प्रा.शिवाजी दळे यांना ज्ञानज्योती पुरस्कार २०२६ जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


(छाया : सतीष जगताप)

**खरवंडी कासार–** शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसीचा उपक्रम पारनेर प्रतिष्ठान संचलित शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ज्ञानज्योती पुरस्कार २०२६ चे मानकरी म्हणून संत भगवान बाबा कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, खरवंडी कासार येथील प्राध्यापक मा. श्री. शिवाजी दळे यांची निवड करण्यात आली आहे.शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा व गुणवंतांचा गौरव करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सिताराम खिलारी सर यांनी भूषवले.हा सोहळा शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बु. (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथे शुक्रवार, दिनांक १८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९:३० वाजता उत्साहात पार पडला. शिवाजी दळे यांना हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, त्यांचे सहकारी आणि विद्यार्थ्यांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# ७९व्या वार्षिक निरंकारी संत समागमच्या सेवांचा मंगलमय शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** संत निरंकारी मिशनच्या वतीने सत्गुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात २३ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे श्रद्धा आणि उत्साहपूर्ण वातावरणात ७९व्या वार्षिक संत समागमाचे आयोजन करण्यात येणार आहे. आत्मिक जागृती आणि मानवतेच्या एकतेचा संदेश हृदयात घेऊन देश–विदेशातून लाखो श्रद्धाळू भक्त या समागमात सहभागी होणार असून त्या अनुषंगाने समागमाच्या सेवांचा शुभारंभ आज श्रद्धा, समर्पण आणि सेवाभावाने भारलेल्या वातावरणात झाला. निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन हस्ते सेवा स्थळाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी मिशनच्या कार्यकारिणी समितीचे सदस्य, केंद्रीय सेवादलाचे अधिकारी तसेच हजारो श्रद्धाळू भक्तांनी प्रेम आणि निष्ठेने सेवेत सहभाग घेतला. संत निरंकारी मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय राजकुमारी ‘मामीजी’ आणि संत निरंकारी मंडळाचे सचिव आदरणीय श्री. जोगिंदर सुखीजा यांनी पुष्पगुच्छ अर्पण करून निरंकारी राजपिताजींचे हार्दिक स्वागत केले.

७९व्या संत समागमाच्या सेवांच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित श्रद्धाळूंना संबोधित करताना निरंकारी राजपिताजींनी सत्गुरू माताजींचे प्रेम आणि आशीर्वाद संतांपर्यंत पोहोचवत सांगितले की, संत समागमाच्या सेवांचे हे विशाल स्वरूप असंख्य संतांच्या निःस्वार्थ सेवा, त्याग आणि समर्पणाचे फलित आहे. यातूनच आपल्या जीवनातही सेवा आणि परोपकाराची भावना जागृत करण्याची प्रेरणा मिळते. मानवजन्म केवळ स्वतःसाठी नव्हे, तर इतरांच्या सुख–दुःखात सहभागी होण्यासाठी मिळाला आहे. सेवेतून ‘मी’ची भावना संपून ‘आपण’ची भावना निर्माण होते, तेव्हाच सेवेचा खरा अर्थ प्रकट होतो. सत्गुरूंचे ज्ञान हीच ती जागृती आहे, जी आपली दृष्टी बदलून प्रत्येक मानवामध्ये निरंकाराचे स्वरूप पाहण्याची प्रेरणा देते. जेव्हा मानव मानवावर प्रेम करेल आणि त्याचा सन्मान करेल, तेव्हा ही धरती अधिक सुंदर बनेल. सत्गुरूंच्या चरणी हीच प्रार्थना आहे की, आपण केवळ मानव म्हणून नव्हे, तर आपल्या कर्मातून आणि वर्तनातूनही खऱ्या अर्थाने मानव बनू शकू.

यंदाच्या संत समागमाची ‘जागृती’ ही संकल्पना असून, ती मनुष्याला बाह्य जगापासून अंतर्मुख होऊन स्वतःच्या अंतरंगात डोकावण्याची आणि आपल्या वास्तविक स्वरूपाची ओळख करून घेण्याची प्रेरणा देते.

# ऐसा संस्थेच्या वतीने अभियंता दिन उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुणवत्तापूर्ण काम, शिस्त आणि कठोर परिश्रम या भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी सांगितलेल्या मार्गावर चालणे आवश्यक आहे अभियंत्यांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून दर्जेदार व पर्यावरण पूरक प्रकल्प उभे करावे. प्रामाणिकपणे आणि सचोटीने काम केल्यास यश निश्चित मिळते, असा संदेश स्ट्रडकॉम कन्सल्टंटचे संचालक व प्रतिथयश आरसीसी डिझायनर इंजि. जयंत इनामदार यांनी दिला.

अहिल्यानगर इंजिनिअर्स असोसिएशनच्या (एसा) वतीने अभियंता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून इंजि. जयंत इनामदार उपस्थित होते. यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, शहर अभियंता मनोज पारखे, उपशहर अभियंता श्रीकांत निंबाळकर, सहायक संचालक पुनम पंडित, टाऊन प्लॅनर बालाजी केकाण, स्वाती अहिरे, शरद बर्डे, गणेश कोकाटे, रविराज पेखले आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक एस.आर.जे. स्टीलचे रीजनल हेड प्रकाश सोनावणे, एरिया सेल्स हेड अविनाश पुरोहित, विशाल येसेकर, टोस्टेम विंडोचे शुभम बनसोडे, शनीराज टाइल्सचे शिवाजी शिंदे, व्यंकटेश इंफ्राचे ओम आठरे तसेच अंबिका स्टोन क्रशर, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, श्री आनंद सेल्स, पटेल सिरॅमिक, वैष्णवी टाईल्स, डायकीन एसी, श्रीराम मार्बल, अर्टिको लिफ्ट, पंकज स्टील, ढोणे ट्रेडर्स, अभय सेल्स कॉर्पोरेशन, शुभारंभ टाइल्स, संकल्प इंटरप्रायजेस, डायमंड टाईल्स यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# बालसंगोपन योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अकोलेतच करावी

**अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या बालसंगोपन योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या एकल महिला व त्यांच्या मुलांची चौकशी व पडताळणी अहिल्यानगर येथे न करता अकोले येथेच करण्यात यावी, अशी मागणी श्री समर्थ सेवा ट्रस्ट अंतर्गत अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समितीच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत समितीच्या अध्यक्षा रूपाली रेणुकदास यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुक्यातील एकल महिलां यांनी डॉ.पंकज आशिया जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना निवेदन दिले . यानंतर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी संजय कदम यांना कार्यवाहीचे निर्देश दिले.

अहिल्या एकल महिला हक्क संरक्षण समिती महाराष्ट्र यांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदात पुढे असे म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या वतीने एकल महिलांच्या मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी राबविण्यात येणारी बालसंगोपन योजना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. मात्र, या योजनेच्या लाभार्थींची चौकशी व पडताळणी करण्यासाठी अकोले विधानसभा मतदारसंघातील एकल महिला व त्यांच्या मुलांना अहिल्यानगर येथे उपस्थित राहावे लागते.

अकोले ते अहिल्यानगर हे अंतर सुमारे १३० किलोमीटर आहे. तर मतदारसंघातील घाटघर, बिताका, जाचकवाडी, कुमशेत, बारी आदी दुर्गम व आदिवासी भागातील गावांपासून अहिल्यानगरचे अंतर १७५ किलोमीटरपर्यंत आहे. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील एकल महिलांना या प्रक्रियेसाठी मोठा प्रवास करावा लागतो. अनेक महिला रोजंदारी अथवा दैनंदिन कामावर अवलंबून असल्याने अहिल्यानगरला जाण्यासाठी त्यांना प्रवासाचा खर्च करावा लागतो. तसेच त्या दिवसाची रोजची मजुरीही बुडते. सकाळी लवकर घरातून निघून सायंकाळी पुन्हा घरी परतणे अनेक महिलांसाठी अडचणीचे ठरते. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे संबंधित बालसंगोपन समितीने लाभार्थी महिलांना अहिल्यानगर येथे न बोलावता अकोले येथे येऊनच लाभार्थी महिला व संबंधित व्यक्तींची चौकशी व पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे महिलांचा प्रवासाचा खर्च वाचेल, रोजंदारी बुडणार नाही आणि त्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणार नाही. तसेच स्थानिक पातळीवर आवश्यक चौकशी व पडताळणी करणेही शक्य होईल.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देत हजरत सय्यद सिद्दीक बावाजान र.अ. यांचा सदल उर्स उत्साहात



अहिल्यानगर - लालटाकी येथील जलालशाह बुखारी कब्रस्तान येथे हजरत सय्यद सिद्दीक बावाजान र.अ. यांच्या सदल उर्सचा धार्मिक वातावरणात उत्साहात समारोप झाला. उर्सनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.उर्सनिमित्त ७०० किलो भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भंडाऱ्याचा लाभ हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्रितपणे घेतला. विविध धर्मांचे नागरिक एकत्र येत श्रद्धा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा जपत हा उर्स साजरा करण्यात आला. त्यामुळे या धार्मिक सोहळ्याच्या माध्यमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला.उर्सच्या निमित्ताने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी हजरत सय्यद सिद्दीक बावाजान र.अ. यांच्या दर्ग्यावर श्रद्धेने उपस्थित राहून दर्शन घेतले. धार्मिक कार्यक्रमासोबतच सर्वधर्मीय नागरिकांनी एकत्र येत भंडाऱ्यात सहभागी होऊन आपुलकी व बंधुभावाचे दर्शन घडविले.या उर्सच्या आयोजनामध्ये हाजी सोहेल जहागिरदार, दानिश शेख, कासिम शेख, वाहिद हुंडेकरी, इक़बाल इराणी, बबलु काजी, इरफान शेख, अल्लाबख्श शेख, शैजान शेख, अयान शेख, जाहीद शेख आणि आकिब सय्यद यांच्यासह परिसरातील नागरिक व भाविकांनी सहभाग घेतला. लालटाकी परिसरातील हा उर्स हिंदू-मुस्लिम बांधवांच्या एकत्रित सहभागामुळे विशेष ठरला. धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेची भावना अधिक दृढ करण्याचे काम या कार्यक्रमातून झाले. हिंदू-मुस्लिम बांधव एकत्रितपणे धार्मिक उत्सव साजरे करीत असल्याने परिसरातील ऐक्याची परंपरा कायम असल्याचे यावेळी दिसून आले.

### ऑल इंडिया मुशायरा चे गणेश फेस्टिवल मध्ये २४ सप्टेंबरला आयोजन




अहिल्यानगर- गणेश फेस्टिव्हल मध्ये नगर महोत्सवात मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व इकरास् पी.ए. इनामदार इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांच्या वतीने भव्य ऑल इंडिया मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता औरंगाबाद रोडवरील डीएसपी ऑफिसच्या बाजूला, हॉटेल पंचवटीका येथे हा मुशायरा रंगणार असल्याचे आयोजक आबीद खान यांनी सांगितले. या मुशायऱ्यात देशभरातील नामवंत शायर सहभागी होणार असून, हैदराबाद येथील शकील जहीराबादी, पुणे येथील अब्दुल हमीद हुनर, अमरावती येथील फारूक रजा, बिहार येथील आलम निजामी, पटना येथील विनित शंकर, मालेगाव येथील इर्शाद अंजुम, नांदेड येथील युसुफ यलगार, धुळे येथील प्रतिभा जय, नगर येथील बिलाल अहमदनगरी तसेच जामखेड येथील शाकीर अहमद आपल्या शायरीने रसिकांना मंत्रमुग्ध करणार असल्याचे नगर महोत्सवाचे संयोजक डॉ कमर सुरूर यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रायोजक दि. मुस्लिम को-ऑप. बँक लि.पुण, सहकार्य काशिद हॉस्पीटल, वेलनेस सेंटर व न्यू मॉडर्न कन्स्ट्रक्शन यांचे लाभले आहे.प्रवेश सर्वांना विनामूल्य आहे.

### गुरुमुखदास खुबचंदानी यांचे वृद्धत्वाने दु:खद निधन



अहिल्यानगर- सिंधी कॉलनी, तारकपूर येथील रहिवासी गुरुमुखदास मोतीराम खुबचंदानी (वय - ९३ वर्ष) यांचे दि.१७ रोजी सकाळी तारकपूर येथील राहत्या घरी वृद्धत्वाने निधन झाले, संत निरंकारी मिशनचे प्रसिद्धी प्रमुख किशोर खुबचंदानी यांचे ते वडिल होत. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी नालेगाव अमरधाम येथील विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. गुरुमुखदास हे निरंकारी मिशनचे अनुयायी होते,अत्यंत शांत स्वभावाचे व विनम्र होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे,त्यांच्या मागे पाच मुले,दोन विवाहित मुली, सुना, जावई,नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले.

# सभासदांना लाभांश देण्याची परंपरा कायम – विक्रम फिरोदिया

**मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारची वार्षिक सभा खेळीमेळीत**






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडाराची सन २०२५-२०२६ ची ६४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन विक्रम फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. संस्थेने सभासदांना द्यावयाच्या लाभांशांची परंपरा दरवर्षीप्रमाणे कायम राखली आहे.

सभेस व्हाईस चेअरमन शैलेश मुनोत, संचालक नरेंद्र फिरोदिया, अरविंद गुंदेचा, अतुल भंडारी, राजेंद्र चोपडा, प्रदिप बोरा, महेश रच्चा, वैभव लांडगे, संतोष गांधी, सचिन डागा, व्यवस्थापक सुरेंद्र भंडारी, प्रशासन अधिकारी प्रकाश गांधी उपस्थित होते. व्यवस्थापक सुरेंद्र भंडारी यांनी सभेची नोटीस वाचून दाखविली नंतर विषय पत्रिकेवरील सर्व विषय मांडले, त्यास उपस्थित सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. जेष्ठ सभासद आर. डी. मंत्री, संजय मुनोत, बांदल सर, सुरेश सिकची यांनी आपले मनोगत व्यक्त करुन ग्राहक भांडाराने अजुन वेगवेगळे व्यवसाय सुरु करण्याबाबत सूचना केल्या . सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पकपणे व समाधानकारक उत्तरे देण्यात आली. त्याचप्रमाणे आर.डी. मंत्री यांनी ज्या सूचना केल्या त्या सूचनांची दखल घेतली जाईल असे सांगितले. संजय मुनोत यांनी सांगितले की, मध्यंतरीच्या गॅस टंचाईच्या काळात भांडाराच्या सर्व कर्मचा-यांनी चांगल्या प्रकारे परिस्थिती हाताळून ग्राहकांना सिलेंडरचे योग्य प्रकारे वाटप केले. अहवाल सालात संस्थेची उलाढाल वाढून नफा देखील चांगला झालेला आहे. पारदर्शी कारभारामुळे संस्थेची प्रगती होत आहे. या सभेस ज्येष्ठ सभासद ॲड. अशोक कोठारी, हनुमान खंडेलवाल, रवींद्र गुजराती, बाबालाल गांधी, आनंद चंगेडिया, मुकुंद देवळालीकर, संदीप गांधी, रवींद्र गांधी, सुभाष भंडारी व इतर अनेक सभासद उपस्थित होते. सभेच्या शेवटी व्हा. चेअरमन शैलेश मुनोत यांनी सर्व सभासदांचे उपस्थित राहिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

# तालुकास्तरीय शासकीय मैदानी क्रीडा स्पर्धेत भिकीबाई मोहनलाल गुगळे विद्यालयाचे उज्ज्वल यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शिशु संगोपन संस्था, अहिल्यानगर संचालित भिकीबाई मोहनलाल गुगळे विद्यालय, सुसरे येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय शासकीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. बाबूजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी येथे पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंनी विविध मैदानी क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी केली.

या स्पर्धेत उदागे वैभव संदीप याने १४ वर्षे वयोगटातील गोळाफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. सातपुते समृद्धी सचिन हिने १७ वर्षे वयोगटातील थाळीफेकमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. कंठाळी ज्ञानेश्वरी सदाशिव हिने १७ वर्षे वयोगटातील भालाफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरावर निवड मिळवली. तसेच कंठाळी सृष्टी गोविंद हिने हातोडाफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

कराळे भक्ती जनार्धन हिने १७ वर्षे वयोगटातील हातोडाफेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय निवड निश्चित केली. नरवडे सुदर्शन आसाराम याने १४ वर्षे वयोगटातील गोळाफेकमध्ये तृतीय क्रमांक, उदागे ऋषिकेश विक्रम याने १७ वर्षे वयोगटातील हातोडाफेकमध्ये तृतीय क्रमांक, उदागे वैष्णवी रमेश हिने १४ वर्षे वयोगटातील गोळाफेकमध्ये तृतीय क्रमांक, तर कंठाळी ज्ञानेश्वरी सदाशिव हिने थाळीफेकमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या यशामागे मार्गदर्शक शिक्षक अशोक मिसाळ सर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षक अशोक मिसाळ यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन मा. दिलीपजी गुंदेचा, व्हाईस चेअरमन दशरथजी खोसे सर, सेक्रेटरी रतिलालजी कासवा सर, सहसेक्रेटरी, राजेशजी झालानी, खजिनदार ॲड. विजयजी मनोत, सुसरे गावच्या सरपंच वैशाली दादासाहेब कंठाळी, उपसरपंच जयश्री राजेंद्र उदागे, मुख्याध्यापक सुनील भापकर सर, सर्व सेवकवृंद, पालक, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आनंद तीर्थ समवशरण येथे सतीश कोठारी यांच्या पंधरा उपवासांचे पच्चक्खाण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात भाविक अतिशय श्रद्धेने तपस्या, उपवास करत आहेत. धर्म जागर आणि आत्मोन्नतीची अनुभूती देणारा चातुर्मास उत्साहात पार पडत आहे. नगरसह देशाच्या विविध भागातील भाविक या अनुष्ठान पर्वाचा लाभ घेत आहेत. करमाळा येथील श्रावक सतीश प्रकाशलाल कोठारी यांनी चातुर्मासात अतिशय श्रद्धेने १५ दिवसांचे उपवास केले. त्यांचे पच्चक्खाण मंगळवारी झाले.

महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात तपस्वींचे पच्चक्खाण झाले. समर्पण चातुर्मास समितीच्या वतीने सतीश कोठारी यांच्यासह अन्य तपस्वींचा सत्कार करण्यात आला. यावेळी समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्य तसेच तपस्वींच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

प्रास्ताविकात अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी सांगितले की, समर्पण चातुर्मासासाठी उपाध्यायश्रीजींचे नगरमध्ये आगमन झाल्यापासून भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. गुरूदेवांच्या आशीर्वादाने चातुर्मासात तपस्यांचा अक्षरशः वर्षाव होत आहे. श्रद्धेय आचार्यश्रींच्या जन्मोत्सवात विक्रमी संख्येने अट्ठाई तप झाले. पर्युषण पर्वातही मोठ्या संख्येने भाविकांनी उपवास केले. मासखमण, पंधरा उपवास, अट्ठाई, एकासन अशी तपस्या करणारांची संख्याही मोठी आहे. यात नगरसह राज्यातील तसेच देशाभरातील भाविकांचा समावेश आहे.

**जेजुरीच्या खंडोबा मंदिराचा जिवंत देखावा गणेश भक्तांचे आकर्षण**

# लोकमान्य टिळक मित्र मंडळाचे सामाजिक धार्मिक सांस्कृतिक ऐतिहासिक कार्य कौतुकास्पद - आमदार जगताप






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री शनेश्वर प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त टिळक रोड येथे श्री खंडोबा मंदिर, जेजुरी तसेच खंडोबा-बाणू विवाह सोहळ्याचा आकर्षक जिवंत देखावा साकारण्यात आला आहे. या देखाव्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप व महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. कलाकारांनी साकारलेला हा देखावा गणेश भक्तांचे विशेष आकर्षण ठरत असून, देखावा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे मोठे काम केले जाते. लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, रक्तदान शिबिर यांसारखे उपक्रम मंडळाच्या माध्यमातून घेतले जातात. त्याचबरोबर गणेशोत्सवाच्या काळात धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक देखावे साकारून आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचे कार्य केले जाते.

यंदा मंडळाच्या वतीने श्री खंडोबा मंदिर, जेजुरी आणि खंडोबा-बाणू विवाह सोहळ्याचा जिवंत देखावा साकारण्यात आला आहे. या माध्यमातून गणेश भक्तांना जेजुरी येथील श्री खंडोबा मंदिराचे प्रत्यक्ष दर्शन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भंडाऱ्याची उधळण, खंडोबा-बाणू विवाह सोहळा तसेच श्री खंडोबा आणि भक्तीच्या कार्याची महती या जिवंत देखाव्यातून साकारण्यात आली आहे. हा देखावा नगरकरांच्या पसंतीस उतरेल आणि तो पाहण्यासाठी मोठ्या संख्येने गणेश भक्तांची गर्दी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकमान्य टिळक मित्र मंडळाचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक कार्य कौतुकास्पद असून, मंडळाचे संस्थापक गोरख पडोळे यांच्या संकल्पनेतून विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, लोकमान्य टिळक मित्र मंडळाने गणेशोत्सवानिमित्त जेजुरी येथील श्री खंडोबा मंदिर व खंडोबा-बाणू विवाह सोहळ्याचे दर्शन गणेश भक्तांना घडविले आहे. हा देखावा पाहताना साक्षात जेजुरीचे श्री खंडोबा राया अवतरल्यासारखे वाटते. आपल्याला लाभलेल्या आध्यात्मिक व धार्मिक परंपरेचे जतन अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून होत असते. नगरसेविका सुजाता पडोळे व गोरख पडोळे यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. मंडळाचे संस्थापक गोरख पडोळे म्हणाले की, आपण समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते, या भावनेतून लोकमान्य टिळक मित्र मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. आपल्या संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने गणेशोत्सवात धार्मिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक देखाव्यांचे आयोजन केले जाते.

मागील दोन वर्षांपासून कलाकारांच्या माध्यमातून जिवंत देखावे सादर करण्यात येत असून, हे देखावे गणेश भक्तांचे आकर्षण ठरत आहेत. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य टिळक मित्र मंडळाचे सामाजिक कार्य सुरू असल्याचे गोरख पडोळे यांनी सांगितले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अक्षय गाडळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी मंडळाचे संस्थापक गोरख पडोळे, नगरसेविका सुजाता पडोळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, चैतन्य घुले, निलेश गाडळकर, मंडळाचे अध्यक्ष अक्षय गाडळकर, उपाध्यक्ष विकी कानडे, पद्मावती बोरुडे, किरण कानडे, चंद्रकांत गाडळकर, सोमनाथ कानडे, राजेंद्र कानडे, रोहित पडोळे, गौरव पडोळे, प्रवीण जाधव, सिद्धांत जाधव, विजय जाधव, श्रेयश पडोळे, शुभम पडोळे, लाभेश पडोळे, तेजस पडोळे, जालिंदर पडोळे, विशाल कारखेले, पांडुरंग कारखले, निलेश गोरे, सुयश हजारे, समर्थ पडोळे, सार्थक पडोळे, सफल पडोळे, मंगेश पुंड, युवराज पडोळे, अर्जुन बोरुडे, रितेश कानडे, अमित कानडे, साई कानडे, प्रसाद कानडे, चेतन कानडे, सार्थक कानडे, सौरभ कानडे, ओम कानडे, रोनित ताठे, निखिल गाडळकर, विशाल गाडळकर, अमित गाडळकर, कृष्णा गाडळकर, विनू गाडळकर, तन्मय नेमाने, साहिल सय्यद, गौरव पटवेकर, यश माने, दत्तरांगे सागर, राम हिलगुडे, विकास पटवेकर, शिंदे धैर्यशील, शंतनु निमसे, शुभम निमसे, आदित्य कोरडे, कृष्णा कारखेले, साई मेहेत्रे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक गणेश पालवे, श्रेणिक शिंगवी, गौतम कारखेले, राजेश एकाडे, मनोज लाटे, संदीप जाधव, मच्छिंद्र पडोळे, बाबासाहेब गाडळकर, राजू जाधव, विनायक कानडे, अशोक गाडळकर, नंदू एकाडे, बनकर सर, सतीश पठारे, नितीन पुंड, सचिन दळवी, पंचम पडोळे, पोपटराव निमसे, रमेश कोरडे, राजूशेठ उदागे आदी उपस्थित होते.

# पुस्तक भिशी व शिक्षक दिनाचा आगळावेगळा उपक्रम उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्रीमती निर्मला भंडारी यांच्या पुढाकारातून पुस्तक भिशी आणि शिक्षक दिनाचा आगळावेगळा कार्यक्रम त्यांच्या निवासस्थानी खेळीमेळीच्या, उत्साही व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी दादा चौधरी विद्यालयातील माजी शिक्षक-शिक्षिकांचा सन्मान करून माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमास दादा चौधरी विद्यालयातील माजी शिक्षिका सुशीला मोडक, विजया निसळ, शैलजा ताडपत्रीकर, प्रभावती रानडे, शालिनी खिस्ती, विद्या भालेराव, पुष्पाताई जोशी, उषा घुमरे, बेबीनंदा वामन, जंगम , सौ. त्रिभुवन, माजी महापौर व नगरसेविका सौ. गीतांजली काळे तसेच शिक्षक विलास साठे उपस्थित होते.
या कार्यक्रमात श्रीमती निर्मला भंडारी यांचा विद्यार्थी व शिक्षकांतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच दादा चौधरी विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. शंकरराव मिसाळ (अग्निशामक दल प्रमुख) आणि श्री. शैलेश उपासनी (डी.वाय.एस.पी.) यांचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. श्री. शैलेश उपासनी हे सपत्नीक उपस्थित होते. तसेच यावेळी आणखी एक माजी विद्यार्थी उपस्थित होते. शंकर मिसाळ यांच्यासोबत माजी विद्यार्थी बंग व गाडीलकर हेही उपस्थित होते.
सत्काराला उत्तर देताना उपस्थितांनी आपल्या जीवनातील शिक्षकांचे योगदान अधोरेखित करत शाळेचे व गुरुजनांचे ऋण व्यक्त केले. दादा चौधरी विद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे पाद्यपूजन करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

कार्यक्रमासाठी दादा चौधरी विद्यालयाचे माजी विद्यार्थी सुनील कुलकर्णी , पत्रकार व फोटोग्राफर उदय जोशी, स्नेहालयाचे भरत कुलकर्णी, राकेश रणसिंग आदी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीमती उषा घुमरे व श्रीमती विजया निसळ यांनी संस्कृत सुभाषित सादर केले, तर श्रीमती विद्या भालेराव यांनी स्वरचित काव्य सादर करून कार्यक्रमात भावपूर्ण रंग भरला.
या निमित्ताने दादा चौधरी विद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कैलासवासी तांदूळवाडकर आणि कै. गोंदके सर यांचीही यावेळी सर्वांना आठवण झाली. त्यांच्या अनुपस्थितीची उणीव सर्वांनाच जाणवली.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुनील कुलकर्णी यांनी केले. यावेळी श्री. विलास साठे यांनी अशा प्रकारचे कार्यक्रम दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित करावेत, अशी सूचना केली. श्रीमती निर्मला भंडारी यांनी मनापासून सर्व उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर सुग्रास व सात्त्विक स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्री विशाल गणेश मंदिराचा परिसर महिलांच्या सामुहिक अथर्वशिर्ष पठाणाने दुमदुमला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त सामुहिक अथर्वशिर्ष पठण व महाआरती करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर विणा दिघे, अमृता बेडेकर,गायत्री मिसाळ ,अश्विनी वाडेकर ,कविता अनमल ,माधवी ऋषी ,श्रेया कुलकर्णी,स्नेहा जोशी ,अपर्णा बालटे आदिंनी अथर्वशिर्ष पठणास प्रारंभ केला. यावेळी रेखा झंवर, आशा पुंड जोती नराल,मंदाकिनी सोनवणे, अश्विनी डोंगरे ,सुरेखा मणियार आदिं महिलांनी शंख नाद केला.

या अथर्वशिर्ष मध्ये असंख्य महिला सहभागी झाल्या होत्या. पारंपारिक वेशभुषा, एक ताल-





सुरात अथर्वशिर्षने परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी मुलांशु परदेशी,सरोज पालडीया ,उर्वी भावे यांनी श्री गणेशाची भक्ती गीते सादर केली. त्यांना संगिताची साथ मकरंद खरवंडीकर हर्षल भावे ,कार्तिक चव्हाण ,प्रवण देशपांडे यांनी केली त्यानंतर महाआरती करुन प्रसाद वाटपाने सांगता झाली.

या अथर्वशीर्ष साठी प्रसादासाठी मच्छिंद्र चधरी ,सुधीर सूळ ,बाळासाहेब व्यापारी ,गणेश पालवे ,राजेश एकाडे, राजु जग्गी,वैभव जगताप ,किशोर सुडके ,वैभव दरेकर ,सतीश पठारे ,प्रदीप झोडगे, संदीप बेरड ,राहुल धोकरिया ,गिरीश पप्पाल , चंद्रकांत फुलारी ,गणेश आंबेकर ,मिलिंद कानडे, संदीप फुलसोंदर ,विनायक कानडे ,महेश दांगडे, प्रणित अनमल ,नितीन पुंड आदिंनी केले.

याप्रसंगी महंत संगमनाथ महाराज , देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे, रंगनाथ फुलसौंदर,चंद्रकांत फुलारी , ज्ञानेश्वर रासकर ,बापूसाहेब एकाडे प्रा माणिकराव विधाते संजय चाफे, नितिन पुंड आदिं उपस्थित होते.







०१) खिस्त गल्ली मधील वर्धमान तरुण मंडळाने भीष्म प्रतिज्ञा महाभारत देखावा उभारला आहे. ०२) दाळमंडई तरुण मंडळाने योग् तपस्वी श्री चांगदेव आणि ज्ञनेश्वर महाराजाची भेट देखावा उभारला आहे. ०३) नेप्ती नाका चोक येथील नवग्रह प्रतिष्ठान मित्र मंडळाने राष्टनिर्मितीचे तीन आधारस्तंभ हा देखावा उभारला. ०४) माळीवाडा तरुण मंडळाने वटपौर्णिमा सुवासिनीचा हा देखावा तयार केला. ०५) श्री महालक्ष्मी तरुण मंडळाने श्री करवीर निवासीनी कोल्हापूर च्या महालक्ष्मी ची कथा हा जिवंत देखावा सादर केला आहे (सर्व छाया-राजू खरपुडे ,नगर)

# अध्यात्मिक क्षेत्रातील योगदानाबद्दल स्वामी समर्थ तपोवन केंद्रात सुनील त्र्यंबके यांचा सन्मान



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सामाजिक कार्याबरोबरच आध्यात्मिक क्षेत्रात श्रद्धा सबुरीने काम करीत साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून सावेडी उपनगरात साई मंदिर उभारले,प्रती शिर्डीप्रमाणे भक्तांसाठी दर्शन, महाप्रसाद याची सोय केली. राजकारण कमी आणि समाजकारण जास्त अशी भूमिका सातत्याने ठेवून साईबाबांच्या कृपेने आध्यात्मिक क्षेत्रातील सुनील त्र्यंबके यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या अभिष्टचिंतन निमित्त स्वामींचा प्रसाद म्हणून प्रतिमा भेट देऊन त्यांचा केंद्राचे वतीने सन्मान करीत आहोत. असे प्रतिपादन त्रंबकेश्वर स्वामी समर्थ केंद्राचे अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर व जामखेड तालुक्याचे अध्यक्ष एकनाथ खिलारी यांनी केले.

सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक दोनचे माजी नगरसेवक साई संघर्ष सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनील त्र्यंबके यांच्या वाढदिवसा निमित्त तपोवन रोडवरील श्री.स्वामी समर्थ केंद्राच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बबन पालवे, भाऊसाहेब देशमाने, सुभाष निंबाळकर, संतोष शिंदे, महादेव शिरसाठ, कानिफनाथ साबळे, देविदास डहाळे, अभिजीत खामकर, पाटील साहेब हभप रविंद्र महाराज आव्हाड, आगडगाव भैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष नितीन कराळे आदींसह सर्व सेवेकरी उपस्थित होते. श्री.खिलारी यांनी सुनील त्र्यंबके यांच्या सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक कार्याची माहिती यावेळी दिली.

यावेळी सन्मान स्वीकारल्या नंतर श्री.त्र्यंबके यांनी तपोवन केंद्रासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे सांगितले. हा सन्मान माझा नसून सर्व भक्तांचा आहे.असे ते म्हणाले.



स्वस्तिक चौकातील राजयोग प्रतिष्ठान ट्रस्टने जय मल्हार हा जिवंत देखावा सादर केला आहे नकळतपणे सर्व जण हा देखावा पाहताना नतमस्तक होत होती. (छाया-उदय जोशी)




०१) लक्ष्मी कारंजा येथील संकल्प युवक मंडळाचा आकर्षक गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली आहे. ०२) जय मातादी मित्र मंडळाने बालाजी रूपी गणेश मूर्तीची प्रतिष्ठा केली आहे.

# ‘कमवा व शिका’ योजनेअंतर्गत संवाद व ‘बुक टॉक’ उपक्रमाची सुरुवात

## विद्यार्थ्यांनी मांडले जीवनानुभव, आदर्श व्यक्तिमत्त्वे व भविष्यातील दिशा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे, श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर. महाविद्यालयात दि. २१ सप्टेंबर २०२६ : विद्यार्थी विकास मंडळ विभागाच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील ‘कमवा व शिका’ योजनेअंतर्गत संवाद उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमाची सुरुवात विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. एकनाथ जाधव व ‘कमवा व शिका’ योजना समन्वयक प्रा. संतोष कोकाटे यांच्या पुढाकाराने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या संवाद उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी ‘माझे जीवनानुभव, माझ्या जीवनातील आदर्श आणि माझ्या भविष्यातील



दिशा’ या विषयावर आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनातील विविध अनुभव, त्यातून मिळालेली शिकवण, आपल्या जीवनावर प्रभाव टाकणारी आदर्श व्यक्तिमत्त्वे तसेच भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक ध्येय याबाबत मनमोकळेपणाने आपली मते व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविणे, पुस्तकांशी मैत्री निर्माण करणे आणि वाचनातून वैचारिक विकास घडवून आणणे या उद्देशाने ‘बुक टॉक’ उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी आपल्या आवडत्या पुस्तकाची ओळख, पुस्तकातील प्रेरणादायी विचार तसेच त्या पुस्तकाचा आपल्या जीवनावर झालेला परिणाम याबाबत मनोगत व्यक्त करणार आहेत. ‘कमवा व शिका’ योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन व आत्मविश्वास निर्माण करण्याबरोबरच ‘बुक टॉक’च्या माध्यमातून वाचनाची आवड, चिंतनशीलता आणि वैचारिक समृद्धी वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या अनुभवांची आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.

# नीतिमूल्ये, संस्कार आणि गुरूंचा आदर विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया

## आदर्श विद्यालय अँड फार्मसी, खडकवाडी येथे डॉ. बाळासाहेब शिंगोटे यांचे मार्गदर्शन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खडकवाडी –** खडकवाडी येथील आदर्श विद्यालय अँड फार्मसी येथे विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शनपर कार्यक्रमात केंद्रप्रमुख डॉ. बाळासाहेब शिंगोटे यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील नीतिमूल्ये, संस्कार आणि गुरूंच्या महत्त्वाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. शिंगोटे यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात चांगले संस्कार आत्मसात करावेत, आई-वडिलांचा तसेच गुरूंचा आदर करावा, असे सांगितले. आई-वडील आणि गुरू यांच्यामध्येच देवाचे स्वरूप पाहावे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांची जाणीव करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना चांगले विचार, शिस्त, संस्कार आणि जबाबदारीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य अनिल ढोकळे, खिल्लारी सर, झावरे सर, पौर्णिमा गांगड मॅडम, माया गागरे मॅडम, सायली मॅडम, अपेक्षा मॅडम, साळवे मॅडम, कुदनर सर, हरीश सर, खामकर मॅडम तसेच पालकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा मार्गदर्शनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याने पालक व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

# पाथर्डी तालुका दुष्काळ जाहीर करुण चारा छावण्या चालू कराव्यात - बाबासाहेब ढाकणे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**खरवंडी कासार** – पाथर्डी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून हेक्टरी १ लाख रुपये मदत द्या आणि पशूं धनासाठी साठी चारा छावण्या सुरू करा सामाजिक कार्यकर्ते तथा किसान आघाडीचे बाबासाहेब ढाकणे यांनी मागणी केली आहे यावर्षी पावसाने पाठ फिरवल्यामुळे पाथर्डी तालुक्यात अत्यंत गंभीर आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, पाथर्डी तालुका अधिकृतपणे दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात यावा तसेच खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत देण्यात यावी आणि जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात, असे निवेदनात म्हटले आहे पाणी आणि चाऱ्याचा गंभीर प्रश्नतालुक्यात अत्यंत कमी पाऊस झाल्यामुळे सध्या सर्व तलाव आणि विहिरी कोरड्या पडल्या आहेत. यामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून माणसांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरांना चाऱ्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाशूंना वेळेवर चारा आणि पाणी न मिळाल्यास त्यांचे प्रचंड हाल होत आहेत.शासनाने तात्काळ घेण्याची गरज आहे पाणी संकट चारा संकट आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने टँकर वाढीव मंजुरीच्या प्रस्तावांना विलंब न लावता तात्काळ पाणीपुरवठा सुरू करावा. ज्या भागात तीव्र गरज आहे, तिथे तातडीने चारा डेपो चारा छावण्या सुरू करण्याची गरज आहे आशी मागणी बाबासाहेब ढाकणे यांनी केली आहे .

# पारनेरच्या पाणीप्रश्नावर मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक

## वर्षभरात योजना पूर्ण करण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर –** पारनेर शहराच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पाणीप्रश्नाला कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारनेर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन पाणीपुरवठा योजनेबाबत सविस्तर चर्चा केली.

पारनेर शहराची वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची वाढती गरज तसेच सध्याच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी याबाबत औटी यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे लक्ष वेधले. पारनेर शहरासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेऊन कालबद्ध पद्धतीने या योजनेचे काम मार्गी लावावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेर शहराच्या पाणीप्रश्नाकडे शासन सकारात्मकपणे पाहत असून येत्या सहा महिन्यांत या योजनेच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर साधारण एका वर्षाच्या कालावधीत योजना पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.



पारनेर शहराचा पाणीप्रश्न हा दरवर्षी उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या टंचाईपुरता मर्यादित नसून भविष्यातील शहराची गरज लक्षात घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे नव्या पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पारनेरकरांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा पाठपुरावा करण्यात आला असल्याचे माजी नगराध्यक्ष विजयराव औटी यांनी सांगितले.

# ग्रीन चौकातून मोटारसायकलवरून वाळूचोरी; प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण –** शहरातील ग्रीन चौक परिसरातून मोटारसायकलवरून वाळूची वाहतूक करण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. मोटारसायकलवरून वाळू नेऊन ती पुढे एका ठिकाणी साठवली जाते. त्यानंतर या साठवलेल्या वाळूची छोट्या टिप्परमधून अवैध वाहतूक केली जात असल्याची चर्चा आहे.

मोटारसायकलच्या माध्यमातून वाळूची वाहतूक होत असल्याने प्रशासनाच्या कारवाईपासून बचाव करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकारामुळे शहरात अवैध वाळू वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# गणेश उत्सवात युवकांचे संघटन प्रेरणादायी - माजी उपसरपंच शरद दहिफळे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**खरवंडी कासार –** गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून ते समाजाला एकत्र आणणारे आणि तरुणांच्या कलागुणांना वाव देणारे मोठे माध्यम आहे. या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र आलेले युवकांचे संघटन अत्यंत प्रेरणादायी आणि कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन माजी उपसरपंच शरद दहिफळे यांनी केले ते शिवराजे प्रतिष्ठाण खरवंडी कासार आरती प्रसंगी व्यक्त केले यावेळी माजी उप सरपंच शरद दहिफळे यांचा सन्मान संदिप देशमुख यांनी केला तर बाळासाहेब जवरे यांचा सन्मान पत्रकार सतिश जगताप तर प्राध्यापक मयुर



जायभाये यांचा सन्मान बाळा जंगम यांनी केला स्थानिक गणेशोत्सव मंडळाला भेट देऊन श्री गणेशाचे दर्शन घेतल्यानंतर ते उपस्थितांशी संवाद साधत होते. यावेळी मंडळाच्या वतीने शरद दहिफळे यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.पुढे बोलताना शरद दहिफळे म्हणाले की, ‘‘लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली, तोच उद्देश आजचे तरुण पुढे नेत आहेत. उत्सवाच्या काळात युवक ज्या शिस्तीने, एकजुटीने आणि उत्साहाने काम करतात, ते पाहता या ऊर्जेचा वापर गावाच्या आणि समाजाच्या विकासासाठी व्हावा. तरुणांनी संघटित होऊन सामाजिक उपक्रम, स्वच्छता अभियान आणि गरजूंना मदत करण्यासाठी नेहमी पुढे आले पाहिजे.‘‘या प्रसंगी गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरवंडी कासार वाढीव टँकर प्रस्ताव तात्काळ मंजुर करावा - सरपंच प्रदीप पाटील

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**खरवंडी कासार –** खरवंडी कासार परिसरात दुष्काळ जन्य परिस्थिती निर्माण झाली असुन दिवसेन दिवस पाणी टंचाई तिव्र होत आहे पाण्यासाठी आलेले टँकर वरून ग्रामस्थात वाद होत आहेत वाढीव पाणी टँकर ग्रामविकास अधिकारी प्रशासक यांनी विशेष लक्ष देऊन खरवंडी कासार ग्रामपंचायत स्थळी उपस्थित राहुन पाणी वाटप करावे खरवंडी गावासह वाडी वस्तीवर पाण्याची मागणी होत आहे जुन्या लोकसंख्या नुसार माणसी पाणी नव्वद हजार लिटर त्यात ही काही टँकर नादुरस्त अभावी खेपा बंद मागील जनगनना आताची वाढलेली संख्या खुप तपावत आहे पाणी। टँकर उपुरे पडत आहेत असे मत खरवंडी कासार सरपंच प्रदिप पाटील यांनी व्यक्त केले दि. २१ ऑगष्ट रोजी ग्राम सेवक संघटनेचा संप सताना सरपंच पाटील यांनी ग्रामसभेचे आयोजन करत शासनाच्या परिपत्रकाचे वाचन करत माहीती दिली ग्राम सभेत ग्रामस्थांच्या मागणी नुसार वाढीव टँकर प्रस्थाव घेण्यात आला मात्र अंबल बजावणी झाली नाही आतातरी प्रशासक ग्रामसेवक यांनी दखल घेऊन वाढीव टँकर प्रस्थाव तात्काळ मंजुरीसाठी पाठवावा असे निवेदनात म्हटले आहे अन्यथा पाणी वाटप यंत्रणेसमवेत उपस्थित राहुन पाणी वाटप करावे .जिल्हा प्राथमिक केंद्र शाळा , भगवान विद्यालय खरवंडी कासार विद्यार्थी पाणी समस्या वाढली आहे पाणी घ्यावेच लागते दुष्काळ जन्य परिस्थिती आहे प्रशासक ग्रामसेवक यांनी खरवंडी कासार येथे टंचाई काळात रहिवास करावा असे पाटील म्हणाले.

(पान १ वरून)

# भगवान विष्णूच्या दशावतारांचा जिवंत देखावा गणेश भक्तांचे आकर्षण

काळात जिवंत देखाव्याची संकल्पना राबवून कलाकारांच्या माध्यमातून विविध विषयांवर समाजप्रबोधन करण्याचे कार्य मंडळाने सुरू ठेवले आहे.यावर्षी भगवान विष्णूचे दशावतार हा धार्मिक देखावा साकारण्यात आला असून, त्यातून आपल्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या माध्यमातून पुढील पिढीला अध्यात्मिक व धार्मिकतेचा वारसा समजण्यास मदत होईल. भगवान विष्णूचे दशावतार हा जिवंत देखावा गणेश भक्तांचे विशेष आकर्षण ठरेल, असे आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले.

यावेळी माजी नगरसेवक विपुल शेटीया म्हणाले की, आपण समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून जय हिंद तरुण मंडळाच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. आपल्या धार्मिक व सांस्कृतिक संस्कृतीचे जतन व्हावे, या उद्देशाने गणेशोत्सवामध्ये भगवान विष्णूचे दशावतार या जिवंत देखाव्याचे आयोजन गणेश भक्तांसाठी करण्यात आले आहे. हा देखावा गणेश भक्तांचे आकर्षण ठरत असून, नागरिकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या वतीने विविध सामाजिक कार्य सुरू असल्याचे विपुल शेटीया यांनी सांगितले.

देखाव्याच्या उद्घाटनप्रसंगी राजाभाऊ कोठारी महाराज, आदेशनाथ महाराज, मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष तथा माजी नगरसेवक विपुल शेटीया, विशाल शेटीया, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक महेश लोंढे, गोरख पडोळे, अतुल कावळे, मनीष फुलडाहाळे, राजेश चेगेडिया, उपाध्यक्ष बाली ठाकूर, उमेश राठोड, अमोल ठाकूर, किरण ठाकूर, दीपक ठाकूर, त्रिशूल उरणे, गणेश होनावळे, सुरज ठाकूर, सोनू चांदेकर, सुजित साळुंखे, गजेंद्र अकसाळ, प्रीतम मुथा, निखिल शेटीया, प्रशांत मुथा, स्वयम् शेटीया, विपाशू शेटीया आदींसह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.